AC – 20.04.2024
Item No. – 5.4 (N) Sem I (1d)

# As Per NEP 2020

# University of Mumbai

| | |
|---|---|
| **Syllabus for Basket of OE** | |
| **Board of Studies in Marathi** | |
| **UG First Year Programme** | |
| **Semester** | **I** |
| **Title of Paper** | **Credits** |
| नाटक एक प्रयोगजीवी कला २<br>(नाट्यलेखन आणि दिग्दर्शन) | **2** |
| **From the Academic Year** | **2024-25** |

| Sr. No. | Heading | Particulars |
|---|---|---|
| 1 | **Description the course :**<br><br>**Including but Not limited to :** | **नाटक एक प्रयोगजीवी कला २**<br>**(नाट्यलेखन आणि दिग्दर्शन)**<br>प्रथम वर्ष बी.ए. मराठी OPEN ELECTIVE या विषयासाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५पासून पहिल्या सत्रात **'नाट्य लेखन आणि दिग्दर्शन'** ही अभ्यासपत्रिका नेमलेली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे आंतरविद्याशाखीय अभ्यास हे उद्दिष्ट समोर ठेऊन योजलेल्या या अभ्यास पत्रिकेद्वारे नाटक या प्रयोगजीवी कलेचे **'नाट्य लेखन आणि दिग्दर्शन'** हे घटक विस्ताराने परिचित करून देणे, येथे अभिप्रेत आहे. सदर अभ्यासक्रम दोन श्रेयांकनांसाठी योजला आहे.<br>'साहित्याचे विभाजन काव्यात्म, कथात्म आणि नाट्यात्म या प्रकारांत केले जाते. या साहित्यप्रकारानुरूप त्यांचे घटक आणि लेखनाच्या पध्दती बदलतात. नाटक या साहित्यप्रकाराची अन्वर्थकता त्याच्या प्रयोगातून सिद्ध होत असते त्यामुळे नाट्यलेखनातून दृश्य उभे राहील याप्रकारे ते लिहावे लागते. शिवाय नाटकाच्या प्रकारानुरूप, पात्रानुरूप भाषावापराचे भिन्न तंत्र लेखक योजतात. लेखकाची ही कलात्मकता अभ्यासणे आणि नाट्यलेखनाच्या कौशल्यांचा परिचय करून देणे या दोन्ही दृष्टींनी नाट्यलेखनाचे स्वरूप जाणणे आवश्यक आहे. तसेच नाटकाचा दिग्दर्शक नाट्यसंहितेच्या आधारे प्रयोगाची रचना करतो. एकच संहिता वेगळ्याप्रकारे सादर करण्याचे कौशल्य दिग्दर्शकाकडे असते. त्यास अपेक्षित नाट्यार्थ व्यक्त करण्यासाठी अभिनेते, नेपथ्यकार, प्रकाशयोजनाकार आदी सर्वांचे संयोजन दिग्दर्शक करतो. ही दिग्दर्शकीय कौशल्ये जाणून घेणे आणि नाटकात दिग्दर्शकाने घडवलेली प्रायोगिकता अभ्यासणे याही दृष्टीने प्रथम वर्षाच्या मराठी विषयाच्या OPEN ELECTIVE या स्तंभात **'नाट्य लेखन आणि दिग्दर्शन' ही अभ्यासपत्रिका नेमलेली आहे.**<br>मराठी साहित्य'हा प्रमुख विषय नसणाऱ्या विद्यार्थ्यांना नाटकाच्या लेखन आणि दिग्दर्शन या घटकांचा विस्ताराने परिचय करून देत नाट्यविषयक भान विकसित करणे आणि भाषिक अंग लाभलेल्या या प्रयोगकेंद्री कलाप्रकाराचे सांस्कृतिकदृष्ट्या असणारे महत्त्व लक्षात आणून देणे या प्रमुख उद्देशांनी ही अभ्यासपत्रिका नेमलेली आहे.<br>या अभ्यासपत्रिकेअंतर्गत नाट्य लेखन आणि दिग्दर्शन हे दोन भाग केले असून प्रत्येकी एक श्रेयांकन नेमून सदर अभ्यासक्रमाची श्रेयांकन पद्धतीनुसार रचना करण्यात आलेली आहे.<br>सदर अभ्यासक्रम नाट्यसृष्टीशी जोडणारा आहे. |
| 2 | **Vertical :** | Open Elective |
| 3 | **Type :** | Theory |
| 4 | **Credit**: | 2 credits ( 1 credit = 15 Hours for Theory) |

| | | |
|---|---|---|
| 5 | **Hours Allotted :** | 30 Hours |
| 6 | **Marks Allotted**: | 50 Marks |
| 7 | **Course Objectives**:<br>१. नाट्यलेखन आणि दिग्दर्शन या नाट्यघटकांचे बारकावे जाणून घेणे.<br>२. नाट्यलेखनाचे वेगळेपण लक्षात घेऊन नाट्यप्रकार व भिन्न आशयानुरूप बदलणाऱ्या लेखनपद्धती, तंत्रे, संवादलेखनाचे स्वरूप यांचा परिचय करून देणे.<br>३. दिग्दर्शकाच्या कार्यप्रणालीचा परिचय देत नाटकातील दिग्दर्शकीय दृष्टीचे भान देणे .<br>४. नाट्य लेखन आणि दिग्दर्शकीय कौशल्यांचा परिचय करून देणे.<br>लेखक, दिग्दर्शक आपल्या वैशिष्ट्यपूर्ण नाट्यरूपातून समाजविषयक सजगता निर्माण करतात याविषयीची जाणीव विकसित करणे. | |
| 8 | **Course Outcomes**:<br>१. नाट्यलेखन आणि दिग्दर्शन या नाट्यघटकांचे बारकावे समजतील.<br>२. नाट्यलेखनाचे वेगळेपण लक्षात घेऊन नाट्यप्रकार व भिन्न आशयानुरूप बदलणाऱ्या लेखनपद्धती, तंत्रे, संवादलेखनाचे स्वरूप यांचा परिचय होईल.<br>३. दिग्दर्शकाच्या कार्यप्रणालीचा परिचय होऊन नाटकातील दिग्दर्शकीय दृष्टीचे भान येईल.<br>४. नाट्य लेखन आणि दिग्दर्शकीय कौशल्यांचा परिचय होईल.<br>५. लेखक, दिग्दर्शक आपल्या वैशिष्ट्यपूर्ण नाट्यरूपातून समाजविषयक सजगता निर्माण करतात याविषयीची जाणीव विकसित होईल. | |
| 9 | **Modules**:- | |
| | **Module 1: घटक एक : नाट्य लेखन** | |
| | १. नाट्यलेखन : संकल्पना व स्वरूप, चित्रपट लेखन, कथालेखन आदी प्रकारच्या लेखनापेक्षा नाट्यलेखनाचे असलेले वेगळेपण<br>२. नाट्यरचना प्रकार आणि नाट्यप्रकृतीनुसार नाट्यलेखनाच्या भिन्न पद्धती (उदाहरणार्थ: एकपात्री प्रयोग, दहा मिनिटांचा प्रवेश, एकांकिका, दीर्घांक, पूर्ण लांबीची नाटके, संगीत नाटक, वगनाट्य आणि वास्तववादी, बिनवास्तववादी असंगत, आदी.)<br>३. नाट्यरचनाप्रकार व नाट्यप्रकृतीनुसार व्यक्तिचित्रण व संवादलेखन यांचे स्वरूप.<br>**(६० मिनिटांच्या एकूण १५ तासिका -श्रेयांकन -१ )** | |
| | **Module 2**: **घटक दोन : नाट्य दिग्दर्शन** | |

| | |
|---|---|
| | १. दिग्दर्शक आणि दिग्दर्शन : संकल्पना आणि स्वरूप<br>२. नाट्यरचना प्रकार व नाट्य प्रकृतीनुसार दिग्दर्शकाचे कार्य<br>३. नाट्यरचना प्रकार व नाट्यप्रकृतीनुसार रंगमंच, नेपथ्य, अभिनय, प्रकाश-संगीत योजना यांची दिग्दर्शकीय दृष्टीकोनातून रचना.<br><br>**(६० मिनिटांच्या एकूण १५ तासिका -श्रेयांकन -१ )** |
| **10** | **Text Books:**<br>**NA** |
| **11** | **संदर्भसूची :**<br>१. माझा नाट्यलेखन - दिग्दर्शनाचा प्रवास - डॉ.वि.भा. देशपांडे, उन्मेष प्रकाशन , पुणे, १९८८<br>२. झिम्मा - आठवणींचा गोफ -विजया मेहता, राजहंस प्रकाशन, पुणे.<br>३. नाटकवाल्याचे प्रयोग - अतुल पेठे, मनोविकास प्रकाशन.<br>४. नाट्यनिर्मिती प्रक्रिया - दलपतसिंग येती गावा, संपादक-विनोद शिरसाठ, साधना प्रकाशन, पुणे.<br>५. लागलेली नाटकं - राजीक नाईक, शब्द प्रकाशन, मुंबई.<br>६. मराठी नाटक आणि रंगभूमी - वसंत आबाजी डहाके, पॉप्युलर प्रकाशन, २०१८, मुंबई.<br>७. निवडक निबंध १ रंगभूमी आणि साहित्य - मकरंद साठे, मनोविकास प्रकाशन, २०१८.<br>८. के. ना. काळे यांच्या लेखांचे संपादन (प्रतिमा, रूप आणि रंग), संपा. डॉ.वि.भा. देशपांडे, नूतन प्रकाशन, पुणे<br>९. मराठी नाटक आणि रंगभूमी (भाग १ व २) - वि.भा.देशपांडे.<br>१०. ललित मासिक - नाट्य विशेषांक<br>११.रंग नाटकाचे- पुष्पा भावे<br>१२.Drama: Text into Performer - Peter Reynolds<br>१३.प्रवीण भोळे यांच्या ब्लॉगवरील लेख रंगण (pradabho.blogspot.com) |
| **12** | **Internal Continuous Assessment: 40%** \| **External, Semester End Examination 60% Individual Passing in Internal and External Examination** |

| | | |
|---|---|---|
| **13** | **Continuous Evaluation through:**<br>Quizzes, Class Tests, presentation, project, role play, creative writing, assignment etc.( at least 3 ) | **अंतर्गत चाचणी परीक्षा : २० गुण**<br>चाचणी परीक्षा-लेखी/ऑनलाईन , गृहपाठ, सादरीकरण - २० गुण |
| **14** | **Format of Question Paper:** for the final examination<br><br>बहिर्गत परीक्षा ३० गुण (वेळ एक तास)<br>• एकूण तीन प्रश्न विचारावेत.<br>• प्रत्येक घटकावर अंतर्गत पर्याय असलेले प्रत्येकी १० गुणांचे दोन प्रश्न विचारावेत.<br>तिसरा प्रश्न हा घटक १ आणि २ वर आधारित दहा गुणांचा वस्तुनिष्ठ स्वरूपाचा असावा. | |

Sign of the BOS Chairman

Name of the Chairman: **Prof. Satish Kamat**

Name of the BOS: **Marathi**

Sign of the Offg. Associate Dean

Name of the Associate Dean: **Prin. Dr. Suchitra Naik**

Name of the Faculty: **Humanities**

Sign of the Offg. Dean

Name of the Offg. Dean: **Prin. Dr. Anil Singh**

Name of the Faculty**:** **Humanities**